| अ. क्र | पोलीस ठाणे | वैशिष्टपुर्ण कामगिरीची थोडक्यात माहीती | पोलीस अधिकारी व अंमलदार नाव | वैशिष्टपुर्ण कामगिरीचा फोटो |
|---|---|---|---|---|
| | **पनवेल शहर** | पनवेल शहर पोलीस ठाणे गु.रजि.नंबर २५/२०२१ भा.द.वि.कलम ३९२, ३९४, ४२७,५०४,५०६,३४ हा गुन्हा दिनांक ०९/०१/२०२१ रोजी १५:३९ वाजता दाखल आहे.<br>दिनांक ०९/०१/२०२१ रोजी ०४:३० ते ०५:३० वाजण्याचे दरम्यान जे.डब्ल्यु.सी कंटेनर यार्डचे आऊट गेटचे बाहेरील बाजुस असलेल्या सर्व्हीस रोडवरील भारत पेट्रोल पंपासमोर ते उत्सव हॉटेल समोरील पनवेल लेनवरील रोडच्या डाव्या बाजुस,पळस्पे,ता.पनवेल,जि.रायगड येथे आरोपीत नाम **१) हामद अब्दुल रहीम सय्यद, वय २६ वर्ष, २)साहील गोपाळ चव्हाण,वय २० वर्ष ३)निजामउददीन इकबाल खान,वय १९ वर्ष, सर्व रा.कोपरखैरने,नवी मुंबई व पाहीजे आरोपी अशोक म्हस्के (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही)** यांनी इनोव्हा कारमधुन येवुन आपसात संगणमत करून फिर्यादी याचे कंटेनर क्रमांक एम.एच ४३ यु ८४१६ मधील डिझेल चोरी करण्यासाठी फिर्यादी यांचेवर दगड फेकुन दगडाचा धाक दाखवुन, दगडाचे साहयाने काचा फोडुन, कॅबीनमध्ये चढुन त्यांना लाथा—बुक्यांनी मारहाण करून बोनेटवरचे त्यांचे ११००/— रूपये जबरीने घेवुन शिवीगाळी व धमकी दिली. तसेच साक्षीदार नामे जुल्फीकार शहाबुददीन अली, वय ३४ वर्ष, रा.दिल्ली याचे लॉरी क्रमांक एम.एच ४६ बीबी ९०८५ हिचे ४० लीटर डिझेल चोरी केले म्हणुन सदरचा गुन्हा दाखल आहे.<br>**वरील नमुद आरोपी क्रमांक ०१ ते ०३ यांना दिनांक ०९/०१/२०२१ रोजी सदर गुन्हयात अटक केली असुन त्यांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेली २०,००,०००/—रूपये किंमतीची सिल्व्हर रंगाची इनोव्हा क्रिस्टा कार क्रमांक एम.एच ०१ सीव्ही ६८२३ ही त्यांच्याकडुन हस्तगत केली आहे.**<br>तसेच सदर गुन्हयातील अटक आरोपीत यांनी तपासा दरम्यान पनवेल शहर पोलीस ठाणे गु.रजि.नंबर ३७९, ४२७ हा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन चोरी केलेले डिझेल मधील २०० लीटर डिझेल चोरीचे असल्याचे सांगुन आरोपी नामे अश्विन अनिल सिंग,वय २३ वर्ष रा. कोपरखैरने, नवी मुंबई यास विकले असल्याचे सांगुन त्यास दाखविल्याने त्यास तपासकामी ताब्यात घेवुन दिनांक १३/०१/२०२१ रोजी अटक केली आहे. **सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.** | पोउपनि/सुनिल तारमळे.<br>पोहवा/९८५ विजय आयरे.<br>पोना/२०६८ परेश म्हात्रे.<br>पोशि/३०६७ युवराज राऊत.<br>पोशि/३२३९ विवेक पारासुर<br>पोशि/१२०२९ यादवराव घुले.<br>पोशि/३५८३ सुनिल गर्दनमारे | **फोटो उपलब्ध नाही.** |